**ठळक बातम्या**

- भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक राहिला नसून तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा प्रणेता बनला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- विश्वचषकाला गवसणी घालणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर अभिनंदनाचा वर्षाव / बीसीसीआयकडून ५१ कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर

- उद्योजक अनिल अंबानी यांच्या रिलायन्स समूहाशी संबधित तीन हजार कोटी रुपये किंमतीच्या चाळीसहून अधिक मालमत्ता ईडीकडून जप्त

- टांझानियाच्या अध्यक्षपदी सामिया सुलुहू हसन पुन्हा विराजमान

**आणि**

- रस्ते अपघातात तेलंगणामध्ये १९, तर राजस्थानमधे १४ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक राहिला नाही, तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा प्रणेता बनला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्लीमध्ये उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेष परिषद २०२५चं उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. देशात नवोन्मेषाची परिसंस्था निर्माण व्हावी यासाठी सरकार प्रयत्न करत असून जगातली सर्वात यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा भारतात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

या कार्यक्रमात त्यांनी देशातल्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला चालना देण्यासाठी १ लाख कोटी रुपये अर्थसहाय्य देणाऱ्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजनेचाही प्रारंभ केला. खासगी क्षेत्राकडून संचलित केल्या जाणाऱ्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला प्रोत्साहन देणं हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमत्र्यांनी सांगितलं.

**होल्ड... बाईट - प्रधानमंत्री**

शिक्षणतज्ज्ञ, संशोधन संस्था, उद्योग आणि सरकारमधल्या ३ हजारांपेक्षा जास्त सहभागींना एकत्र आणणं हे या तीन दिवसीय परिषदेचं उद्दिष्ट आहे. यामध्ये भाषणं, पॅनेल चर्चा, सादरीकरणं आणि तंत्रज्ञान विषयक प्रदर्शनं आयोजित केली जातील. देशाची विज्ञान आणि तंत्रज्ञान परिसंस्था मजबूत करण्यासाठी संशोधक, उद्योग आणि तरुण नवोन्मेषकांमधल्या सहकार्यासाठी हे योग्य व्यासपीठ ठरेल.

**<><><><><>**

आयसीसी विश्वचषक महिला क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेला हरवून विश्वचषकाला गवसणी घालणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्व थरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं आहे. या विश्वविजेत्या संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं ५१ कोटी रुपयांचं रोख पारितोषक जाहीर केलं आहे.

विश्वचषक जिंकण्यासाठी भारतीय महिला संघातल्या प्रत्येक खेळाडूचं मनापासून अभिनंदन. या खेळाडूंच्या प्रतिभेला आणि कामगिरीला साजेसा हा विजय असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाल्या. महिला संघाने संपूर्ण स्पर्धेत आपली सांघिक कामगिरी आणि दृढनिश्चय दाखवत हा ऐतिहासिक विजय मिळवल्याची भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. हा ऐतिहासिक विजय देशासाठी आनंदाचा क्षण असून महिला संघाने आपल्या क्रिकेट कौशल्याने लाखो मुलींना प्रेरणा दिल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही या संघाचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

हॉकीची १०० वर्षं साजरी करण्यासाठी येत्या ७ नोव्हेंबर रोजी देशभरातल्या साडेपाचशेहून अधिक जिल्ह्यांमध्ये १ हजार ४००हून अधिक हॉकी स्पर्धा आयोजित केल्या जातील, अशी माहिती केंद्रीय क्रीडा मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत माध्यमांशी बोलत होते. या उपक्रमाचा उद्देश खेळाबद्दल व्यापक जागरुकता निर्माण करणं, तरुणांना हा खेळ खेळण्यासाठी प्रोत्साहित करणं तसंच देशाची क्रीडा संस्कृती बळकट करणं हा आहे. यामुळे तरुणांना हॉकीचा इतिहास जाणून घेऊन त्यांचं भविष्य घडवण्यासाठी प्रेरणा मिळेल, असं मांडवीय म्हणाले.

**<><><><><>**

उद्योजक अनिल अंबानी यांच्या रिलायन्स समूहाशी संबधित तीन हजार कोटी रुपयांच्या चाळीसहून अधिक मालमत्तांवर सक्तवसुली संचलनालयानं टाच आणली आहे. दिल्ली, नोएडा, गाजियाबाद, मुंबई, पुणे, ठाणे, हैदराबाद, चेन्नई, कांचीपुरम आणि पूर्व गोदावरी इथं या मालमत्ता आहेत. अनिल अंबानी यांच्यावरील कर्ज घोटाळा आणि मनि लॉंड्रिंग प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

**<><><><><>**

हिंसक निदर्शनं आणि विरोधकांचा बहिष्कार या पार्श्वभूमीवर झालेल्या निवडणुकीनंतर, टांझानियाच्या अध्यक्ष सामिया सुलुहू हसन यांनी राजधानी डोडोमा इथल्या लष्करी परेड मैदानावर आज कडक सुरक्षेत दुसऱ्यांदा शपथ घेतली. आपल्या विजयी भाषणात सामिया म्हणाल्या की, मतदान मुक्त आणि लोकशाहीवादी होतं. त्यांनी निदर्शकांना देशद्रोही म्हटलं. सामिया यांना ९८ टक्के मतांसह विजयी घोषित करण्यात आलं.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी निवडणुकीच्या पारदर्शकतेबद्दल आणि हिंसाचाराच्या वृत्तांवर चिंता व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

व्हॅलेन्सियाचे अध्यक्ष कार्लोस माझोन यांनी देशांतर्गत झालेला जनक्षोभ आणि राजकीय दबावामुळे राजीनामा देण्याची घोषणा केली आहे. व्हॅलेन्सियात गेल्या वर्षी आलेल्या पुरामुळे २२९ जणांचा बळी गेला होता. पुरावेळी पत्रकारासोबत जेवण करण्यात वेळ घालवल्यानं आपत्कालीन सूचना जारी करण्यासाठी विलंब केल्याचा आरोप माझोन यांच्यावर होता. यानंतर माझोन यांच्या राजकीय विरोधकांकडून सातत्यानं त्यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत होती.

<><><><>

तेलंगणामध्ये रंगारेड्डी जिल्ह्यात चेवेल्लाजवळच्या मिर्जागुडा-खानापूर रस्त्यावर आज सकाळी झालेल्या अपघातात एकूण १९ जणांचा मृत्यू झाला. विकाराबाद-हैदराबाद मार्गावर एका ट्रकनं एका दुचाकीच्या मागून पुढं जाण्याचा प्रयत्न करताना आरटीसी बसला धडक दिल्यानं हा अपघात झाला. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं आहे.

अपघाताची माहिती मिळण्यासाठी लोकांना मदत करण्यासाठी राज्य सरकारनं हैदराबादमध्ये एक नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. विशेष वैद्यकीय पथकं घटनास्थळी दाखल झाली आहेत.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

<><><><>

राजस्थानमधल्या जयपूर परिसरातल्या सिकर महामार्गावर आज झालेल्या रस्ते  अपघातात १४ जण मृत्युमुखी पडले असून ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना जयपूरमधल्या सवाई मानसिंह  रुग्णालयात दाखल केलं आहे. हा अपघात एका डंपर चालकाचं वाहनावरचं नियंत्रण सुटल्यामुळं झाला असल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल यांनी या दुर्घटनेबाबत तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. मोदी यांनी मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपयांची तर जखमी नागरिकांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेत्री दया डोंगरे यांचं आज वार्धक्यानं निधन झालं. त्या ८५ वर्षांच्या होत्या. अनेक मराठी चित्रपट आणि नाटकांमधून त्यांनी केलेल्या भूमिका लोकप्रिय ठरल्या. मंतरलेली चैत्रवेल, लेकुरे उदंड जाहली, संकेत मीलनाचा ही त्यांची काही गाजलेली नाटकं. तर नवरी मिळे नवऱ्याला, मायबाप, आत्मविश्वास, उंबरठा हे काही गाजलेले चित्रपट आहेत. दूरदर्शन वाहिनीवरच्या गजरा या कार्यक्रमाचं निवेदनही दया डोंगरे यांनी केलं होतं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी समाज माध्यमावर दया डोंगरे यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी असलेली प्रचाराची मुदत उद्या संपत असल्यामुळे आज प्रचार शीगेला पोचली आहे. रालोआ आणि महागठबंधन या आघाड्यांच्या महत्वाच्या नेत्यांनी आज बिहारच्या वेगवेगळ्या भागात प्रचारसभा आणि रॅली घेतल्या.

**प्रधानमंत्री आणि भाजपाचे स्टार प्रचारक नरेंद्र मोदी** यांनी सहरसा, कठीहार या ठिकाणी घेतलेल्या प्रचारसभेतमहागठबंधन हा सक्षम नसलेल्या राजकीय पक्षांचा समूह असल्याचा आरोप केला. **तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री करण्यासाठी काँग्रेस तयार होणार नाही असंही मोदी यावेळी म्हणाले.**

जे**ष्ठ भाजपा नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह** यांनी शेहर आणि सितामढी इथं प्रचारसभा घेतल्या. बिहारमधला अन्नटंचाईचा प्रश्न सोडवण्यासाठी

केंद्रातलं एनडीए सरकार गंभीर असल्याचं त्यांनी सांगितलं. **योगी आदित्यनाथ** यांनीही अनेक सभांमधून काँग्रेस तसंच राजद वर टीका केली.

प्रधानमंत्री नरेद्र मोदी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आपल्या कारकिर्दीत किती लोकांना खरोखरचा रोजगार दिला हे लोकांना सांगावं असं आव्हान **काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे** यांनी वैशाली जिल्ह्यातल्या राजापाकार इथं घेतलेल्या प्रचारसभेत दिलं.

//<><><><><>//